# स्त्रियांच्या मराठी कादंबरीतील गांधीवाद

**डॉ. लता पांडुरंग मोरे,** मराठी विभाग प्रमुख, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी

---

**प्रास्ताविक :-**

महात्मा गांधी हे गेल्या दोन शतकातील जगातील सर्वात जास्त चर्चा झालेले व्यक्तिमत्व आहे. जगातील शंभरहून जास्त देशात गांधीजींची स्मारके आहेत. त्यांच्या नावाचा रस्ता, पुतळा, पोस्टाची तिकीट अशा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात गांधीजींच्या स्मृती हे देश जपत आहेत; तसेच त्यांच्यापासून प्रेरणा घेत आहेत. महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर किंवा त्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळी सर्व जगाने त्यांचा सन्मान केला; त्याच्या मुळाशी त्यांच्याविषयी वाटणारा आदरभाव होता.

महात्मा गांधी यांची जीवन पद्धती आदर्श मानून गांधीवाद निर्माण झाला. गांधीवादाचा भारतातच नव्हे तर पाश्चात्त्य देशातही आदर केला जातो. महात्मा गांधीजींच्या जीवन व कार्याचा जनमानसावर सखोल व व्यापक परिणाम झाला. समग्र मानवी जीवनाचे कल्याण, सत्य, अहिंसा आणि नैतिक मूल्यांचा आग्रह या तत्त्वावर आधारित जगण्याची जी जीवनदृष्टी आहे ती महात्मा गांधीनी समाजाला दिली. गांधीवाद ही एक जीवनदृष्टी आहे. ही जीवनदृष्टी धार्मिक तत्त्वज्ञानावर आधारित असली तरी आचारधर्माचे प्रत्यक्ष उपयोजन, समाजकारण, राजकारण शिक्षण याविषयी विशिष्ट जीवन विषयक दृष्टिकोन या विचारसरणीने दिला. इंद्रिय सुखाला विरोध करून सुखवादी विचारापेक्षा त्यागमय जीवनाकडे कल असा गांधीवादी विचारसरणीचा दृष्टिकोन आहे. अहिंसा हे सत्याकडे नेणारे साधनमूल्य आहे आणि व्यापक अर्थाने ब्रह्मचर्य हा एक महत्त्वाचा आचारधर्म आहे असे गांधीजींनी मानले. ईश्वरावर नितांत श्रद्धा आणि निर्भयता या गोष्टी गांधीजींना अत्यंत महत्त्वाच्या वाटतात. यंत्रावर आधारित समाज व्यवस्थेला त्यांनी विरोध केला. यंत्रामुळे जर खेडी उध्वस्त होत असतील तर त्यालाही विरोध केला. ग्रामीण खेड्यांचे शोषण व यंत्राधिष्टीत समाज व्यवस्थेतून होणाऱ्या पिळवणुकीला विरोध करत त्यांनी 'खेड्याकडे चला' हा संदेश तरुणांना दिला.

महात्मा गांधींना जात, धर्म, वर्ण, संप्रदाय, वंश, राष्ट्र या कल्पनांच्या आधारे निर्माण होणारी सहिष्णूता आणि एकूणच माणसाला हीन लेखणाऱ्या कोणत्याही गोष्टी मान्य नव्हत्या. १९२० मध्ये टिळकांचा मृत्यू झाला. एका अर्थाने टिळकयुग संपून गांधीयुगाला सुरुवात झाली. १९२० ते १९४५ हा काळ गांधीयुग म्हणून ओळखले जाते. गांधीयुगाचा परिणाम त्या काळातील अनेक विचारवंतावर झाला. आचार्य विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, आचार्य जावडेकर, पु. य. देशपांडे, सानेगुरूजी अशा अनेक विचारवंतवार गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला.

१९२० नंतर गांधीवादी विचारप्रणालीचा उगम झाला. सामाजिक क्षेत्रात गांधीवादी विचारांचे वारे वाहू लागले. गांधीजींचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वतंत्र व पुरोगामी होता. स्त्रियांच्या सामर्थ्याची व नैसर्गिक क्षमतांची जाणीव त्यांना होती. त्यामुळेच त्यांनी अनेक राजकीय व सामाजिक उपक्रमात स्त्रियांना सहभागी करून घेतले. महात्मा गांधींच्या आवाहनाला स्त्रियांचा खूप मोठा प्रतिसाद लाभला. म. गांधींच्या आवाहनांनुसार सूत कताई, स्वदेशी प्रचार, अनेक सत्याग्रह, निदर्शने यामध्ये स्त्रियांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रेमा कंटक, कृष्णा (किसन) घुटकर यांच्यासारख्या पदवीधर स्त्रिया अविवाहित राहून गांधींच्या चळवळीत सहभागी झाल्या.

गांधीजींच्या आवाहनामुळे स्वातंत्र्यलढ्याबरोबरच विविध सामाजिक, राजकीय उपक्रमात स्त्रियांचा सहभाग वाढला. केवळ शहरी, पांढरपेशा समाजातीलच नव्हे तर सर्व स्तरातील स्त्रिया सामाजिक कार्यात सहभागी होऊ लागल्या. १९३७ मध्ये प्रांतिक सरकार निर्माण झाले आणि मोठ्या संख्येने स्त्रिया राजकारणात उतरल्या. काही स्त्रियांनी प्लॅनिंग कमिशनवर काम केले. स्त्रियांची होमगार्ड पथके निर्माण झाली. या पथकांनी स्वातंत्र्य चळवळीत चांगले कार्य केले. १९४२ मध्ये 'शेड्युल कास्ट फेडरेशन' या महिला परिषदेची स्थापना झाली. नागपूर येथे भरलेल्या अधिवेशनात २५ हजार स्त्रिया उपस्थित होत्या. या अधिवेशनात अनेक स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे भाषणे केली. प्रस्तुत निबंधामध्ये महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव स्त्रियांच्या मराठी कादंबरी विश्वात कशाप्रकारे पडला आहे याची मांडणी केली आहे. ही मांडणी / संशोधन करताना आशयनिष्ठ संशोधन पद्धतीचा प्रामुख्याने अवलंब केला आहे.

गांधीवादी विचारसरणीचा फार नसला तरी थोडासा प्रभाव महाराष्ट्रात दिसतो. संपूर्ण भारतात गांधीवादाचा खरा वारस विनोबा भावे यांना मानले जाते. वैचारिक क्षेत्रात गांधीवादाची तर्कशुद्ध मांडणी दादा धर्माधिकारी यांनी केली आहे.

गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव स्पष्टपणे दिसतो. मराठी कादंबरीच्या बाबतीत काही थोड्याच लेखकांच्या लेखनामध्ये तो दिसतो. यामध्ये वा. म. जोशींच्या 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे, सरला भोळे'; मामा वरेरकर यांच्या 'फाटकी वाकळ', 'मी रामजोशी'; गांधीवादाचा जाणीवपूर्वक प्रभाव वि. स. खांडेकरांच्या 'कांचन मृग', 'उल्का', 'क्रौंचवध', 'दोन ध्रुव' अशा कादंबऱ्यावर आढळतो. गांधीवादाचा विचार अतिशय निष्ठेने व श्रद्धेने साने गुरुजी व प्रेमाकंटक यांनी केला. साने गुरुजींची 'श्यामची आई' सर्वार्थाने गांधीवादी आहे. याशिवाय त्यांच्या 'क्रांती', 'संध्या', 'रामाचा शेला', 'धडपडणारी मुले' या कादंबऱ्यावर गांधीवादाचा प्रभाव दिसतो

मराठी स्त्रियांच्या कादंबरीच्या बाबतीत प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी' (१९३७), 'अग्नियान' (१९४२) या दोन्ही कादंबऱ्यांवर गांधीवादाचा प्रभाव आहे. याशिवाय दुर्गाबाई जोशी यांच्या 'सातपुड्यातील वनलक्ष्मी' (१९४३) व राणी गुहागर यांच्या 'जीवन' (१९४१) या कादंबऱ्यावर गांधीवादाचा प्रभाव दिसतो.

प्रेमा कंटक यांचे नाव राजकीय क्षेत्रातील निष्ठावान व्यक्ती म्हणून अत्यंत आदराने घेतले जाते. महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांनी महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमात आजन्म लोकसेवेचे कार्य केले. त्यांच्या 'काम आणि कामिनी' (१९३७) या कादंबरीत नैष्ठिक ब्रम्हचर्य व ग्रामोद्धाराचे तत्व आले आहे. प्रेमा कंटक स्वत: साबरमती आश्रमात गांधीजी व इतर लोक यांच्या समवेत संध्याकाळी फिरायला जात असत. अशाच एका संध्याकाळी गांधीजींच्या तत्वज्ञानाच्या प्रभावामुळे 'काम आणि कामिनी' ही कादंबरी लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

ही कादंबरी शुद्ध गांधीवादी विचारांची आहे. या कादंबरीचा नायक मुकुंदा असून त्याची आई सत्यवती देशाभिमानी होती. तिच्या वडिलांनी व चार भावांनी स्वातंत्र्य चळवळीत बलिदान दिले होते. सत्यवती देशाभिमानी असली तरी मुकुंदला मात्र ती चळवळीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करते. परंतु मुंबईत शिक्षण घेताना मुकुंदला टॉलस्टॉय यांचे जीवन आदर्श वाटू लागते. आईच्या आग्रहामुळे त्याचा विवाह वृंदा या मुलीशी होतो. पण तो संसारात रमत नाही. बायकोच्या भावनांचा आदर करुन तो तिला पूर्ण स्वातंत्र्य देण्यास तयार असतो. पण विवाह सौख्याला पारखी झालेली वृंदा मुकुंदचा मित्र चंद्रशेखरच्या प्रेमात पडते. वृंदा घरातून निघून गेल्यानंतर मुकुंद सोनगावला आश्रम काढून लोकसेवेत आयुष्य घालवतो. कालांतराने वृंदा, चंद्रशेखर व त्यांचे बाळ मुकुंदच्या आश्रमात राहण्यासाठी येतात. मुकुंदा त्यांना क्षमा करतो. पण पुढे न्युमोनिया होऊन त्याचा मृत्यू होतो. विशेष म्हणजे मुकुंदाच्या मृत्यूनंतर त्याचे समाजसेवेचे कार्य वृंदा स्वतः करू लागते.

गांधीवादावर आधारलेली ही कादंबरी विषयाचे वेगळेपण घेऊन व्यक्त झाली आहे. या कादंबरीत ब्रह्मचर्यासंबंधीने गांधींच्या विचारावर भर दिला आहे. कथा, वातावरण निर्मिती, कादंबरीत रंगविलेल्या समस्या, उद्देश, पात्र रचना या सर्वच गोष्टी गांधीवादाला साजेशा घेतल्या आहेत. ही कादंबरी लोकांसमोर आली तेव्हा आदर्शवादी लेखन कालबाह्य ठरत होते व वास्तववातवादाचा आग्रह धरला जात होता. आपल्या कादंबरीवर आक्षेप घेतले जातील याची कल्पना लेखिकेला असावी. त्यामुळेच या कादंबरीत समाज सुधारणेची कळकळ आणि आपल्या आदर्शवादाचे समर्थन केले आहे. त्यामुळे त्यांनी उभी केलेली कथावस्तू सर्वसामान्य लोकांना अनैसर्गिक वाटते. मुकुंदासारखी आदर्शवादी माणसे अपवादात्मक असतात. त्यामुळेच वास्तववाद व आदर्शवाद यांचा समन्वय घालण्यात ही कादंबरी अपयशी ठरली आहे असे वाटते.

प्रेमा कंटक यांची 'अग्नियान' (१९४२) ही दुसरी कादंबरी गांधीजींच्या रचनात्मक कार्यावर आधारित आहे. या कादंबरीची नायिका रोहिणी आहे. तिचे आत्मकथन यामध्ये आले आहे. या कादंबरीला राजकीय चळवळीची पार्श्वभूमी आहे. १९२० ची असहकार चळवळ, बारडोली सत्याग्रह, युवक परिषद, लाहोर कॉंग्रेस, दांडी यात्रा, गांधीजींचा चरखा, सूत कताई, परदेशी मालावरील बहिष्कार, स्वदेशी आंदोलन, दारूबंदी, ग्रामोध्दार, शेतकरी परिषदा, फैजपूरचे अधिवेशन अशा अनेक गोष्टींचा समावेश या कादंबरीत केला आहे. या कादंबरीत विविध चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग, लाठी हल्ला, तुरुंगवास यांचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे. अशा सर्व वातावरण निर्मितीमुळे ही कादंबरी वाचकाला तत्कालीन स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणात घेऊन जाते. परंतु या कादंबरीच्या शेवटी गांधी मार्गावरील कमी झालेली निष्ठा नायकाला वाटणारी ईर्षा, आत्मशुद्धीसाठी केलेले उपवास, इत्यादी प्रसंगांमधून दिसते. याविषयी ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "गांधी मार्गावरची लेखिकेची श्रद्धा कुठेतरी डळमळीत झाली आहे. गांधीवादी नायकाच्या मनातली ईर्षा, आत्मशुद्धी खातर केलेले उपवास, इत्यादी गोष्टींचा वाचकावर काहीसा विपरीत परिणाम

होतो. नायकाचा उपवास व आत्मशुद्धी गांधीवादी श्रद्धेतून निर्माण न होता मानसिक गंडातून निर्माण झाल्यासारखी वाटते." (मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड- ६, भाग- १, पृष्ठ- २६४) हे जरी खरे असले तरी तत्कालीन चळवळीवर आधारलेली गांधीजींच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारी, ग्रामोध्दाराला प्राधान्य देणारी, अर्थपूर्ण जगण्याचा संदेश देणारी ही श्रेष्ठ कादंबरी आहे. आदर्शवाद, ध्येयवाद व वास्तववाद यांचा सुंदर समन्वय घडविणारी ही कादंबरी आहे.

रजनी गुहागर यांची 'जीवन ' (१९४१) ही कादंबरी सुद्धा महात्मा गांधीजींच्या अहिंसा चळवळीवर आधारलेली आहे. जीवन हा या कादंबरीचा नायक असून त्याचे वडील सरकारी नोकर आहेत. आपल्या मुलानेही नोकरीच करावी असे त्यांना वाटते. त्यामुळेच ते आपल्या मुलाला इंग्रजांचे श्रेष्ठत्व वारंवार पटवून देतात. परंतु शालेय जीवनात पंडित नेहरू, महात्मा गांधी, नामदार गोखले यांच्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर पडतो. महात्मा गांधीजींच्या भाषणाने तो प्रभावित होतो. पुढे काँग्रेस कार्यकर्त्याच्या उमा नावाच्या मुलीशी त्याचा विवाह होतो. मुंबईच्या वास्तव्यात त्याला गांधीजींच्यावर निष्ठा ठेवणारे अनेक मित्र - मैत्रिणी भेटतात. कविता ही त्याची अत्यंत जवळची मैत्रीण आहे. त्याचे तिच्यावर बहिणीसारखे प्रेम होते. तिचा पती क्रांतीकुमार गव्हर्नरचा खून करतो. तेव्हा कवितेला सुखी ठेवण्यासाठी स्वतःच्या हातात पिस्तूल घेऊन खुनाचा आरोप तो स्वतःवर घेतो. यात त्याला फाशीची शिक्षा होते. फाशी देताना त्याला शेवटची इच्छा विचारतात. तेंव्हा शेवटच्या क्षणीही तो गांधीजींचे भाषण ऐकण्याची इच्छा व्यक्त करतो. त्यामुळे जीवन हा खूप मोठा गांधीप्रेमी वाटतो. या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्वकालीन राजकीय पार्श्वभूमी, गांधीजींच्या अहिंसा चळवळीचा पुरस्कार केला असला तरी जीवनचे बलिदान आणि गांधीवादी विचार मांडण्यातील विसंगती दिसते. या कादंबरीतील जीवनचे बलिदान कविताला सुखी ठेवण्यासाठी असे न करता स्वातंत्र्य प्राप्तीसाठी दाखविले असते तर कादंबरीतील गांधीवाद अधिक परिणामकारक ठरला असता, असे वाटते.

गांधीवादाचा विचार घेऊन कादंबरी लेखनाचा प्रयत्न दुर्गाबाई जोशी यांनीही केला आहे. त्या स्वतः स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होत्या. तसेच मध्यप्रांत कायदेमंडळातही त्यांचा सहभाग होता. खेड्यापाड्यातून व्याख्याने देऊन राजकीय परिस्थितीची ओळख करून देण्याचे काम त्यांनी अनेक वर्षे केले. राजकारणातील खाचाखोचांचे ज्ञानही त्यांना होते. 'सातपुड्यातील वनलक्ष्मी' (१९४३) ही त्यांची विदर्भातील राजकीय पार्श्वभूमीवर आधारलेली कादंबरी आहे. या कादंबरीची नायिका वनलक्ष्मी अत्यंत ध्येयवादी विचारांची आहे. देशद्रोही वर्तन करणाऱ्या पतीला सजा सुनावणारी ती कर्तव्य कठोर पत्नी आहे. या कादंबरीत गांधीजींच्या चळवळीच्या अनुषंगाने काँग्रेसपक्षाचे उपक्रम, चरखा, सूत कताई, दारूबंदी अशा अनेक गोष्टींचा समावेश केला आहे. खेड्यापाड्यापर्यंत देशभक्ती व स्वातंत्र्याची जाणीव कशी पोहोचली हे सांगितले आहे. या निमित्ताने गांधीजींची ग्राम सुधारणा, दारूबंदी या उपक्रमांची आवश्यकता स्पष्ट केली आहे. या कादंबरीचे स्वरूप काही अंशी प्रचारकी थाटाचे आहे.

**समारोप :-**

स्वातंत्र्य चळवळीतील गांधीवादाला अनुसरून मराठीत या तीन लेखिकानी कादंबरी लेखन केले आहे. या लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांमधून गांधीजींची असहकार चळवळ, ब्रह्मचर्य पालन, अहिंसावादी विचारसरणी, खादीचा प्रसार, स्वदेशी चळवळ, ग्रामसफाई, श्रमदान, अस्पृशोध्दार, तरुणांना खेड्याकडे जाण्याचा संदेश असे अनेक विषय हाताळले आहेत. एका अर्थाने गांधीयुगाला आपल्या कादंबऱ्यात स्थान देऊन वास्तव जीवनाशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न या लेखनाद्वारे केला आहे.

**संदर्भ-**

1. गो. म. कुलकर्णी आणि व. दि. (संपादक), 'मराठी वाङ्‌
याचा इतिहास', खंड- ६, भाग -१, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८८
2. डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९६.
3. डॉ. मंदा खांडगे व इतर (संपादक), 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड १ते ३, भारतीय विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२.
4. डॉ. प्रमिला भिरुड, 'मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००३.
5. डॉ. स्वाती कर्वे (संपादक), 'स्त्री विकासाची नवी क्षितिजे', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८.